# मागासवर्गीय मुलां-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

## शासन निर्णय क्र.बि.सी.एच-२०१०/प्र.क्र.४३०/मावक-४, दि.२६ जुलै २०११

**उद्दिष्ट :-** मागासवर्गीय मुलां-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात आलेली आहेत. सदरची योजना सन १९२२ पासुन कार्यान्वीत आहे. नागपूर जिल्यहामध्ये १३ मुलांचे व ९ मुलींचे असे एकुण २२ शासकीय वसतिगृहे सुरु आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात नविन विभागीय स्तरावर २५० क्षमतेचे १ वसतिगृह व तालुकास्तरावर १०० क्षमतेचे २ वसतिगृह असे एकुण ३ वसतिगृहे सुरु करण्यात आलेले आहे. तसेच महानगरात नागपूर येथे नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी १ वसतिगृह सुरु करण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती :-**

१) गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.

२) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

४) वद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये ऑफलाईन पध्दतीने प्रवेश देण्यात येतो.

**लाभाचे स्वरुप :-**

१) मोफत निवास व भोजन, अंथरुण-पांघरुण, ग्रंथालयीन सुविधा.
२) शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेष.
३) क्रमिक पाठयपुस्तके, वह्या, स्टेशनरी इत्यादी.
४) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सुट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्राईंग बोड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी.
५) वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिनी खर्चासाठी निर्वाहभत्ता

**निर्वाहभत्ता**

| | |
|---|---|
| विभागीय पातळीवर | - दरमहा मुलांकरीता रु.८०० व मुलींकरीता रु.९००/- |
| जिल्हा पातळीवर | - दरमहा मुलांना रु.६००/- |
| तालुका पातळीवर | - दरमहा मुलांना रु.५००/- व मुलींना रु.६००/- |

# अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरीता तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा

## शासन निर्णय क्र.बि.सी.एच-२०११/प्र.क्र.२११/मावक-४, दि२९ जुन २०११

•आर्थिक परिस्थीतीमुळे अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेता येत नाही. अशा मुलां-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, म्हणुन प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरु करण्याच्या निर्णय शासनाने घेतलेला आहे. नागपूर जिल्हयामध्ये १) वारेंगाव ता.कामठी, २) वानाडोंगरी ता.हिंगणा येथे शासकीय निवासी शाळा सुरु करण्यात आलेली आहे.

* निवासी शाळेमध्ये इ.५ वी ते १० वी पर्यंतच्या अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींना प्रवेश दिला जातो. जुन २०११ पासुन इ.५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्यात आले असुन सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासुन इ.८ वी व त्यानंतर नैसर्गिक वर्गवाढीनुसार इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु करण्यात आलेले आहे.

* निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

# अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींकरीता तालुकास्तरावर १०० शासकीय निवासी शाळा

## शासन निर्णय क्र.बि.सी.एच-२०११/प्र.क्र.२११/मावक-४, दि२९ जुन २०११

•आर्थिक परिस्थीतीमुळे अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेता येत नाही. अशा मुलां-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, म्हणुन प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरु करण्याच्या निर्णय शासनाने घेतलेला आहे. **नागपूर जिल्हयामध्ये १) वारेंगाव ता.कामठी, २) वानाडोंगरी ता.हिंगणा येथे शासकीय निवासी शाळा सुरु करण्यात आलेली आहे.**

*** निवासी शाळेमध्ये इ.५ वी ते १० वी पर्यंतच्या अनु.जाती व नवबौध्द मुलां-मुलींना प्रवेश दिला जातो. जुन २०११ पासुन इ.५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्यात आले असुन सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासुन इ.८ वी व त्यानंतर नैसर्गिक वर्गवाढीनुसार इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु करण्यात आलेले आहे.**

*** निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.**